**सन २०२६-२७ मध्ये कृषि उन्नती योजनेंतर्गत ॲग्रीस्टॅक प्रकल्पातील डिजीटल क्रॉप सर्व्हे या घटकासाठी रू. ६६८६.०० लक्ष निधीच्या वार्षिक कृति आराखड्यास मान्यता देणेबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: AAP-२०२६/प्र.क्र.२७/१०-अे (E-१५५४५४२)**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
दिनांक:- ०७ मे, २०२६

**वाचा:-** १) केंद्र शासनाच्या डिजीटल ॲग्रीकल्चर मिशन संदर्भातील मार्गदर्शक सूचना.
२) कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०२४/प्र.क्र.१५७/१०-अे, दि. १४.१०.२०२४
३) राज्यस्तरीय प्रकल्प मंजुरी समिती (SLSC) यांच्या ४२ व्या बैठकीचे इतिवृत्त, दिनांक ११.०४.२०२६
४) केंद्र शासनाच्या कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालयाचे पत्र क्र.०३/१४/२०२६-KY(E-१८६५५७), दिनांक २२.०४.२०२६ रोजीचे पत्र.
५) केंद्र शासनाच्या कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालयाचे पत्र क्र.१९(MH ६७०), दि. २३.०४.२०२६ रोजीचे पत्र.

**प्रस्तावना :**

राज्यातील कृषि क्षेत्रात डिजीटल सेवांचा वापर करून शासनाच्या विविध योजनांचा जलद गतीने व परिणामकारक लाभ शेतकऱ्यांना देणे सुलभ व्हावे, याकरीता केंद्र शासनाची ॲग्रिस्टॅक योजना राज्यात राबविण्यास वाचा क्र. २ येथील शासन निर्णयान्वये मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदर योजनेंतर्गत राज्यातील सर्व शेतकऱ्यांचा व त्यांच्या शेतांचा आधार संलग्न माहिती संच (फार्मर रजिस्ट्री), शेतकऱ्यांच्या शेतातील हंगामी पिकांचा माहिती संच (क्रॉप सोन रजिस्ट्री) व शेतांचे भू संदर्भिकृत (जिओ रेफरन्स लँड पार्सल) यांचा माहिती संच एकत्रितरित्या तयार करण्यात येत आहेत. त्यामधील हंगामी पिकांचा माहिती संच (क्रॉप सोन रजिस्ट्री) अंतर्गत डिजीटल पीक सर्वेक्षण (डिजीटल क्रॉप सर्वे) राबविण्यात येत आहे.

२. केंद्र शासनाच्या वाचा क्र. ४ येथिल पत्रान्वये, सन २०२६-२७ करीता कृषि उन्नती योजनेंतर्गत ॲग्रिस्टॅक प्रकल्पातील डिजीटल क्रॉप सर्वे या घटकासाठी केंद्र हिस्सा रू. ४०११.६० लक्ष आणि राज्य हिस्सा रू. २६७४.४० लक्ष अशा एकुण रु. ६६८६.०० लक्ष निधीच्या वार्षिक कृती आराखड्यास (Annual Action Plan-AAP) प्रकल्प मंजुरी समितीने मंजूरी दिलेली आहे. केंद्र शासनाने वाचा क्र. ५ येथील पत्रान्वये, केंद्र शासनाने 1st Mother sanction ची विभागणी सर्वसाधारण प्रवर्गाकरीता ७९ टक्के, अनुसूचित जाती प्रवर्गाकरीता १२ टक्के

व अनुसूचित जमातीकरीता ९ टक्के याप्रमाणात केली आहे. सदर प्रमाण विचारात घेऊन, सदर वार्षिक कृती आराखड्यास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

१. केंद्र शासनाच्या वाचा क्र. (४), (५) व उपरोक्त प्रस्तावनेस अनुसरून, कृषि उन्नती योजनेंतर्गत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी ॲग्रिस्टॅक प्रकल्पातील डिजीटल क्रॉप सर्वे हा घटक राबविण्यासाठी केंद्र हिस्सा (६०%) रू. ४०११.६० लक्ष आणि राज्य हिस्सा (४०%) रू. २६७४.४० लक्ष असा एकूण रू. ६६८६.०० लक्ष (रुपये सहासष्ठ कोटी शहाऐंशी लक्ष फक्त) इतक्या रकमेच्या कार्यक्रमास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. सदर कार्यक्रमाचा प्रवर्गनिहाय तपशिल पुढीलप्रमाणे आहे. -

*(रक्कम प्रत्यक्षात)*

| घटक | प्रवर्ग | केंद्र हिस्सा (६० टक्के) | राज्य हिस्सा (४० टक्के) | एकूण |
|---|---|---|---|---|
| डिजीटल क्रॉप सर्वे (ॲग्रिस्टॅक) | **सर्वसाधारण** | ३१,६९,१६,४०० | २१,१२,७७,६०० | ५२,८१,९४,००० |
| | **अनुसूचित जाती** | ४,८१,३९,२०० | ३,२०,९२,८०० | ८,०२,३२,००० |
| | **अनुसूचित जमाती** | ३,६१,०४,४०० | २,४०,६९,६०० | ६,०१,७४,००० |
| **एकूण** | | ४०,११,६०,००० | २६,७४,४०,००० | ६६,८६,००,००० |

२. कृषि उन्नती योजनेंतर्गत ॲग्रिस्टॅक प्रकल्पातील डिजीटल क्रॉप सर्व्हे हा घटक राबविण्यासाठी सन २०२६-२७ मध्ये होणारा खर्च खालील लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात येईल.-

- **सर्वसाधारण प्रवर्ग-**

| केंद्र हिस्सा -६०% | राज्य हिस्सा-४० % |
|---|---|
| मागणी क्र. डी-३<br>२४०१, पीक संवर्धन<br>(००) १३१, तांत्रिक प्रगती<br>(०१) डिजीटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर फॉर ॲग्रिकल्चर<br>(०१)(०१) ॲग्रिस्टॅक/ (डिजीटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर फॉर ॲग्रिकल्चर) योजना (कें.पु.यो.) केंद्र हिस्सा -६०% (कार्यक्रम)<br>**(२४०१बी५०८), ३१- सहायक अनुदाने** | मागणी क्र. डी-३<br>२४०१, पीक संवर्धन<br>(००) १३१, तांत्रिक प्रगती<br>(०१) डिजीटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर फॉर ॲग्रिकल्चर<br>(०१)(०२) ॲग्रिस्टॅक/ (डिजीटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर फॉर ॲग्रिकल्चर) योजना (कें.पु.यो.) राज्य हिस्सा -४०% (कार्यक्रम)<br>**(२४०१बी५१७), ३१- सहायक अनुदाने** |

- **अनुसूचित जाती प्रवर्ग-**

| केंद्र हिस्सा -६०% | राज्य हिस्सा-४०% |
|---|---|
| मागणी क्र. एन-३<br>२४०१, पीक संवर्धन<br>(००) ७८९, अनुसूचित जातींसाठी विशेष घटक योजना<br>(०१) अनुसूचित जाती घटक कार्यक्रमातंर्गत योजना<br>(०१) (३३) शेतीसाठी डिजीटल सार्वजनिक पायाभूत सुविधा (केंद्र हिस्सा ६०%) (कार्यक्रम)<br>**(२४०१बी६९८), ३१- सहायक अनुदाने** | मागणी क्र. एन-३<br>२४०१, पीक संवर्धन<br>(००) ७८९, अनुसूचित जातींसाठी विशेष घटक योजना<br>(०१), अनुसूचित जाती घटक कार्यक्रमातंर्गत योजना<br>(०१) (३४) शेतीसाठी डिजीटल सार्वजनिक पायाभूत सुविधा (राज्य हिस्सा ४०%) (कार्यक्रम)<br>**(२४०१बी७०४) , ३१- सहायक अनुदाने** |

- **अनुसूचित जमाती प्रवर्ग-**

| केंद्र हिस्सा -६०% | राज्य हिस्सा-४०% |
|---|---|
| मागणी क्र. टी- ०५<br>२४०१, पीक संवर्धन<br>(००) ७८९, जनजाती क्षेत्र उपयोजना<br>(०१) जनजाती क्षेत्र उपयोजना<br>(०१) (४५) शेतीसाठी डिजीटल सार्वजनिक पायाभूत सुविधा योजना (केंद्र हिस्सा ६०%) (कार्यक्रम)<br>**(२४०१बी७१३), ३१- सहायक अनुदाने** | मागणी क्र. टी- ०५<br>२४०१, पीक संवर्धन<br>(००) ७८९, जनजाती क्षेत्र उपयोजना<br>(०१) जनजाती क्षेत्र उपयोजना<br>(०१) (४६) शेतीसाठी डिजीटल सार्वजनिक पायाभूत सुविधा योजना (राज्य हिस्सा ४०%) (कार्यक्रम)<br>**(२४०१बी७२२), ३१- सहायक अनुदाने** |

३. सदर योजना राबविताना खालील अटी व शर्तीचे पालन करण्यात यावेत.-

i. केंद्र शासनाच्या संदर्भाधिन मार्गदर्शक सूचना, केंद्र व राज्य शासनाकडून वेळोवेळी दिल्या जाणाऱ्या सूचना, केंद्र व राज्य शासनाच्या निधी वितरीत करण्याच्या अटी व शर्ती इत्यादी नुसार सदर योजनेची अमंलबजावणी करण्यात यावी.

ii. सदर योजना राबवितांना संबंधित शेतकरी लाभार्थी यांचे ॲग्रीस्टॅक अंतर्गत नोंदणी केलेले फार्मर आयडी, शेत जमीनींचे जिओ टॅगींग झाले आहे, याची खात्री करावी.

iii. खर्चाचे लेखे सुव्यवस्थित ठेवुन सदर खर्चाचे लेखा परिक्षण अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्रे केंद्र व राज्य शासनाला लवकरात लवकर प्रगती अहवालासह सादर करण्यात यावेत.

iv. योजनेच्या वेगवेगळ्या बाबींवरील भौतिक व आर्थिक प्रगती अहवाल केंद्र व राज्य शासनास प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत सादर करण्यात यावा.

v. योजनेशी संबंधित ताळेबंद व लेखापरिक्षण जमा खर्चाची रक्कम यांचा अहवाल अंमलबजावणी यंत्रणेने द्यावा. त्यामध्ये वर्षाच्या सुरुवातीला अखर्चित रक्कम व व्याजाद्वारे मिळालेले उत्पन्न स्पष्टपणे नमूद करण्यात यावे. जेणेकरून पारदर्शी स्वरुपात रक्कम विचारात घेता येईल व संदिग्धता राहणार नाही.

vi. कोणत्याही परिस्थितीत मंजूर कार्यक्रमापेक्षा जास्तीचा कार्यक्रम राबविला जाणार नाही, याची दक्षता घ्यावी.

vii. सदर योजनेकरीता मंजूर झालेला निधी हा ज्या संवर्गासाठी मंजूर केलेला आहे, त्याच संवर्गासाठी खर्च होईल याची दक्षता घेण्यात यावी.

४. सदर योजनेकरीता आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना योजनेचे नियंत्रण अधिकारी म्हणून व त्यांच्या कार्यालयातील सहायक संचालक, लेखा-१ यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. सदर निधी खर्च करतांना विहित कार्यपध्दती अनुसरुन सर्व वित्तीय कायदे/टेंडर नियामावली व नियमांचे/ प्रक्रियेचे/ वित्तीय अधिकारांच्या मर्यादेत/ P.W.D. म्यॅनुअलच्या अधिन राहून/ C.V.C. तत्वानूसार/ CAG च्या निर्देशानुसार / प्रचलित शासन निर्णय/नियम/परिपत्रक/तरतुदीनुसार, बजेट व कोषागार नियमावलीनुसार खर्च करण्याची कार्यवाही अंमलबजावणी यंत्रणांनी करावी. कोणत्याही परिस्थितीत कुठलाही शासन निर्णय/अधिकाराचा भंग होणार नाही, याबाबत दक्षता घेण्याची जबाबदारी संबंधित क्षेत्रिय कार्यालयाची राहिल.

६. प्रस्तुतचे आदेश वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ मधील भाग-पहिला, उपविभाग तीन मधील अनुक्र.४ येथील नियम २७ (२) (ब) अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या शक्तीनुसार विभागाच्या स्तरावर निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६०५०७१६३५१४७१०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

KARAD SANTOSH BANSIRAO

Digitally signed by KARAD SANTOSH BANSIRAO
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Agriculture and ADF Department, 2.5.4.20=F981D5A9FEC2E5D5DC36F39695B5F0E4FF5B340CD5420DF7CBAA28990D692E36, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=90BBB9D3E7E74DE43F8070E2A9A65BFD42747F1995A4F22FDC0240939AAB0835, cn=KARAD SANTOSH BANSIRAO
Date: 2026.05.07 16:36:56 +05'30'

**(संतोष कराड)**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, लोकभवन, मुंबई.

२. मा. विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानपरिषद/ विधानसभा, विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

३. मा. मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

४. मा. मंत्री (फलेत्पादन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

५. मा. राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

६. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई

७. अप्पर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. आयुक्त (जमाबंदी) तथा संचालक भूमिअभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
११. आयुक्त (कृषि), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२. संचालक (ॲग्रीस्टॅक संचालनालय), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३. सर्व विभागीय कृषी सह संचालक, महाराष्ट्र राज्य.
१४. सर्व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, महाराष्ट्र राज्य.
१५. सहायक संचालक (लेखा-१), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१६. महालेखापाल १/२, (लेखा व अनुज्ञेयता)/लेखा परीक्षा) मुंबई/नागपूर.
१७. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
१८. संचालक, लेखा व कोषागरे, मुंबई.
१९. संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.
२०. सह संचालक, लेखा व कोषागरे, संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, ५ वा मजला, मुंबई.
२१. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य.
२२. सर्व तालुका कृषी अधिकारी, महाराष्ट्र राज्य.
२३. कक्ष अधिकारी (२-अे), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
२४. निवड नस्ती (कार्यासन १०-अे)

--------